महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळातील कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांना ६व्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार देय असलेली फरकाची रक्कम अदा करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग

शासन निर्णय क्रमांक :- केव्हीबी-२०१८/प्र.क्र.८७/उद्योग-६.

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दिनांक :- १८ जून, २०१९

<u>वाचा</u> :१) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र. केव्हीबी-२००९/प्र.क्र.१९३/उद्योग-६, दिनांक ०६ मार्च, २०१०.

२) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र. केव्हीबी-२००९/प्र.क्र.२०३/उद्योग-६, दिनांक २८ मार्च, २०१६.

३) महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाचे क्र.कार्यासन-३/आस्थापना/४८, दिनांक ०८ एप्रिल,२०१९ चे पत्र.

प्रस्तावना:-

उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या अनु. क्र. १ येथील शासन निर्णयानुसार महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळातील कर्मचाऱ्यांना ६व्या वेतन आयोगाच्या शिफारशी लागु करण्यात आल्या आहेत. मंडळाच्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्र.३९६१/२००३ दाखल केली होती. सदर याचिकेवर मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिनांक १२ एप्रिल, २००६ च्या न्यायनिर्णयाव्दारे मंडळातील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना दिनांक ०१.०१.२००६ ते दिनांक ३१.०३.२००९ या सेवा कालावधीतील ६ व्या वेतन आयोगाच्या शिफारशी लागु करण्यात यावा असा निर्णय दिला. त्यानुषंगाने मंडळातील ४८१ सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांना ६ व्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार देय असलेली रक्कम अनु. क्र. २ येथील शासन निर्णयाव्दारे अदा करण्यात आलेली असून तद्नंतर निवृत्त होणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांना वेळोवेळी ६ व्या वेतन आयोगाची थकबाकी अदा करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळातील ४१० कर्मचाऱ्यांना ६ व्या वेतन आयोगाची दिनांक ०१.०१.२००६ ते दिनांक ३१.०३.२००९ या कालावधीची वेतन थकबाकी मंजूर करण्याची बाब या नस्तीवर शासनाच्या विचाराधिन होती.

शासन निर्णय:-

महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळातील कार्यरत ४१० कर्मचाऱ्यांना ६ व्या वेतन आयोगाची दिनांक ०१.०१.२००६ ते दिनांक ३१.०३.२००९ या कालावधीची वेतन थकबाकीपोटी देय असलेल्या रू. ६,७५,७९,४०७/-(अक्षरी रुपये सहा कोटी पंच्याहत्तर लाख एकोणऐंशी हजार चारशे सात फक्त) अदा करण्यास या शासन निर्णयाव्दारे मंजूरी देण्यात येत आहे.

२. सदर रकमेच्या आहरण व संवितरणाचे अधिकार विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय, मुंबई यांच्या कार्यालयातील लेखा अधिकारी यांना देण्यात आलेले आहेत. सदर अनुदान खर्च झाल्याबाबतचे विनियोग प्रमाणपत्र मंडळाने शासनास व आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना विहित कालावधीत सादर करावे. तसेच लेख्यांच्या खर्चमेळाबाबत महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई यांच्याकडून विचारणा करण्यात येईल, तेव्हा लेख्यासंबंधीची आवश्यक ती कागदपत्रे मंडळाने महालेखापाल कार्यालयास सादर करावीत.

३. यावरील खर्च मागणी क्रमांक के-७, २८५१, ग्रामोद्योग व लघुउद्योग, १०५ खादी व ग्रामोद्योग (००) (०१) खादी व ग्रामोद्योग मंडळाला सहाय्यक अनुदान (दत्तमत) (२८५१ ०५८५) ३६, सहाय्यक अनुदान (वेतन) या उद्दिष्टांखालील सन २०१९-२० या वित्तीय वर्षासाठी मंजूर अर्थसंकल्पीय तरतूदीतून भागविण्यात यावा व तो त्याच लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

४. सदर शासन निर्णय वित्त विभागाने दिनांक १४.०३.२०१९ रोजी दिलेल्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०१९०६१८१७१२५४९८१० असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Rajiv Madhav Ambikar

Digitally signed by Rajiv Madhav Ambikar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Industries Energy and Labour Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=4afb47d807935092599a3e28024dd3d3c461bada30a950e81e666a02aad578f5, cn=Rajiv Madhav Ambikar
Date: 2019.06.18 17:13:45 +05'30'

(राजीव आंबीकर)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति :- माहितीसाठी व आवश्यक त्या उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित :

१. विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय, मुंबई .
२. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई.
३. अर्थ सल्लागार व मुख्य लेखाधिकारी, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई.
४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई.
५. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), महाराष्ट्र-२, नागपूर.
६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
७. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
८. वरिष्ठ उप महालेखापाल (पडताळणी) बाह्य लेखा परीक्षा विभाग, मुंबई.
९. लेखा अधिकारी, उद्योग संचालनालय, नवीन प्रशासन भवन, मुंबई. (५ प्रती)
१०. कार्यासन अधिकारी, वित्त विभाग (सेवा-९/व्यय-१६), मंत्रालय, मुंबई.
११. निवड नस्ती (उद्योग-६).

परिशिष्ट-अ

महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या कार्यरत अधिकारी/ कर्मचारी यांना ६ व्या वेतन आयोगानुसार देय थकबाकीची रक्कम दर्शविणारे विवरणपत्र

अ.क्र.	संवर्ग	कार्यरत अधिकारी/कर्मचारी संख्या	थकबाकी रक्कम रू.
१	गट-अ	१	१,०२,१३४
२	गट-ब	११	३०,८५,०५३
३	गट-क	३१९	५,५७,१२,४१७
४	गट-ड	७९	८६,७९,८०३
५	**एकूण**	**४१०**	**६,७५,७९,४०७**